रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१५
www.ramprahar.com
◆ बुधवार, ३ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

एअर इंडिया इमारत करारनाम्याचे हस्तांतरण/२
पाली-खोपोली मार्गावर दारूच्या बाटल्यांचा खच/५
नागोठणे नुक्कड गल्लीत 'नो पार्किंग'ची गरज/७

### शेतकरी कर्जमाफीचा निर्णय; आचारसंहितेमुळे घोषणा नाही!



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २) झालेल्या बैठकीत या ३६,५८५ कोटी रुपयांच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले, मात्र सध्या विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्याने मंत्रिमंडळाने मंजुरी देऊनही या निर्णयाची अधिकृत घोषणा करण्यात आली नाही. सरकारच्या या निर्णयाचा फायदा राज्यातील ६५ लाखपेक्षा जास्त कर्जखात्यांना होणार आहे. यामध्ये सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांचे ३६,५८५ कोटी रुपयांचे कर्ज माफ केले जाणार आहे. सप्टेंबर २०२५पर्यंत ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे, त्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून आगामी खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.

# रस्ते सुविधांना बूस्टर

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ला गती



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण संपर्क व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ अंतर्गत आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (एआयआयबी)च्या अर्थसहाय्याने सुमारे ३,५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांच्या कामांसाठी ६,४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी (दि.२) मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या योजनेसाठी एआयआयबीकडून सुमारे ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे ४,५०० कोटी रुपये) कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध होणार असून राज्य शासनाकडून ३० टक्के हिस्सा म्हणून सुमारे २१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे १,९२९ कोटी रुपये) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

प्रकल्पाच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी बाह्य हिस्सा (७० टक्के) आणि राज्य हिस्सा (३० टक्के) यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे तसेच एआयआयबीकडून निधी प्राप्त होईपर्यंत प्रगतिपथावरील कामांचा खर्च राज्य निधीतून करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३साठी मंजूर करण्यात आलेल्या लांबीपैकी राज्य निधीतून स्वतंत्रपणे २,५०० किलोमीटर लांबीची रस्त्यांची कामे हाती घेण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होणार असून शेतीमालाची वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा, बाजारपेठांपर्यंत पोहच आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

### एआयआयबी, एनडीबीकडून रस्त्यांच्या सुधारणांसाठी वित्तीय सहाय्य

राज्यातील रस्ते, पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि राज्याच्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था या उद्दिष्टाला गती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पांसाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक (एआयआयबी) आणि न्यू डेव्हलपमेंट बँक (एनडीबी) यांच्याकडून प्रत्येकी एक अब्ज अमेरिकी डॉलर्सचे अर्थसहाय्य दोन टप्प्यांत घेण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी तीन वर्षांच्या कालावधीत हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. एआयआयबी आणि एनडीबी या दोन्ही संस्थांच्या अर्थसहाय्यांतर्गत पहिल्या टप्प्यात ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलर इतके बाह्य अर्थसहाय्य आणि २१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर इतका राज्य शासनाचा सहभाग मिळून एकूण ७१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर (सुमारे ६,२२१ कोटी रुपये) खर्च अपेक्षित आहे. दोन्ही टप्प्यांची एकूण किंमत प्रत्येकी सुमारे १२,४४२ कोटी रुपये असेल.

या प्रकल्पांतर्गत मोठी वाहतूक वर्दळ आणि ४० टक्क्यांपेक्षा अधिक व्यावसायिक वाहनांची वर्दळ असलेल्या 'ग्रोथ कॉरिडॉर'मधील रस्त्यांच्या सुधारणेला प्राधान्य देण्यात येणार आहे. यामुळे राज्यातील प्रमुख आर्थिक, औद्योगिक, कृषी व व्यापारी मार्गिकांमध्ये वाहतुकीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

### अमृत महोत्सवपूर्ती वाढदिवसानिमित्त सर्व स्तरांतून अभीष्टचिंतन

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



(अधिक छायाचित्रे पान ३, ६, ८ वर.)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्त्व आणि जनतेच्या हृदयात अधिराज्य गाजवणारे थोर समाजसेवक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. त्यांच्या या अमृत महोत्सवपूर्ती वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि.२) सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, साहित्य, वैद्यकीय, सांस्कृतिक, विधी, कला, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभीष्टचिंतन करून निरोगी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी महिला-भगिनींनी त्यांचे सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्यासमवेत औक्षण केले. यावेळी कुटुंबीय उपस्थित होते. त्यानंतर पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे भव्य स्वरूपात अभीष्टचिंतन सोहळा झाला. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासह आजी माजी नगरसेवक, नगरसेविका, जि.प., पं.स. सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

समाजसेवा, दातृत्व, नेतृत्व आणि लोककल्याणाचा अखंड वसा जपत रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या जीवनातील ७५ वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा आणि जनहिताच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून जनमानसात अढळ स्थान निर्माण केले आहे. गरजू, वंचित आणि कष्टकरी घटकांना आधार देत शिक्षण, आरोग्य आणि समाजविकासासाठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. (पान २ वर..)

## महिलांसाठी कॅन्सर जनजागृती, तपासणीसह आरोग्य शिबिर



**पनवेल** : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व तपासणी शिबिर तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात मंगळवारी (दि.२) झाले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या शिबिराला भेट देत उपक्रमाचे कौतुक केले.

या शिबिराचा उद्देश ३० वर्ष व त्यावरील वयाच्या महिलांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करणे आणि त्यांना मोफत वैद्यकीय सेवा पुरवणे हा होता. शिबिरात गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग आणि मुखाचा कर्करोग या गंभीर आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. वेळेवर केलेली तपासणी म्हणजे सुरक्षित आयुष्याची हमी आणि आरोग्य हेच खरे धन हा संदेश या माध्यमातून पोहचवण्यात आला. महिलांनी मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घेतला. (पान २ वर..)

## निवडक

### ऑपरेशन म्यूल हंट अंतर्गत सायबर फसवणुकीचा पर्दाफाश

**गांधीनगर :** देशात झपाट्याने विस्तारत असलेल्या डिजिटल नेटवर्कच्या पार्श्वभूमीवर गुजरात पोलीस आणि सायबर सेंटर ऑफ एक्सलन्स यांनी ऑपरेशन म्यूल हंट १.० अंतर्गत एका मोठ्या नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. देशभरातील आणि केंद्रीय यंत्रणांकडून मिळालेल्या डिजिटल डेटाच्या मदतीने राबविण्यात आलेल्या या ऑपरेशनमध्ये एकूण २२८९ कोटी रुपयांच्या सायबर फसवणुकीचे जाळे उद्ध्वस्त करण्यात यश आले आहे.

### सोलापुरात काँग्रेसची नामुष्की! अधिकृत उमेदवाराचा अर्ज बाद

**सोलापूर :** राज्य विधान परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज छाननीदरम्यान अवैध ठरून बाद करण्यात आला आहे. काँग्रेसकडून सूचक म्हणून अर्ज केलेल्या व्यक्तीनेच घेतलेल्या हरकतीमुळे पक्षाच्या उमेदवारावर ही नामुष्की ओढावली. यामुळे भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत यांचा विजयाचा मार्ग आता सुकर झाला आहे.

## किल्ले रायगडावरील सुविधांची सर्व विभागांनी संयुक्त पाहणी करावी

### मंत्री ॲड. शेलार यांचे निर्देश; व्यापक आराखडा ठरविणार

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड किल्ला परिसरातील विकासकामे, जनसुविधा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, किल्ल्याचे जतन व संवर्धन तसेच रायगड विकास प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी संयुक्त स्थळपाहणी करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले.



रायगड किल्ला विकास पर्यटन आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा मंत्री ॲड.शेलार यांनी मंत्रालयात आढावा घेतला. या बैठकीस रायगड किल्ला विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, महसूल विभागाचे उपसचिव संजय धारूरकर, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, उपसचिव महेश वाव्हळ, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे, रायगडचे निवासी उपजिल्हाधिकारी, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)



नवीन पनवेल : येथील आदई सर्कलजवळ पनवेल महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीत खेळाडूंना सुविधा आणि चालना देण्यासंदर्भात पाहणी करण्यात आली. यावेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, संतोष शेट्टी, समीर ठाकूर, सुमित झुंजारराव, बीसीसीआयचे ग्राऊंड तज्ज्ञ श्री.पाटणकर आदी उपस्थित होते.


## दोन एसटी बसच्या धडकेत सात प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**सुरत : वृत्तसंस्था**

धुळे-सुरत महामार्गावर गुजरातमधील बार्डोलीजवळून जाणाऱ्या महामार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या दोन एसटी बसचा मंगळवारी (दि.२) भीषण अपघात झाला. धडकेनंतर एक एसटी बस थेट महामार्गावर उलटली आणि क्षणार्धात तिला आग लागली. या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने सात प्रवाशांचा जागीच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक प्रवासी जखमी झाले आहेत.

सुरत-धुळे व जामनेर -सुरत या एसटी बसेसचा गुजरातमध्ये भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार बार्डोली तालुक्यातील व्यारा येथे एका बसच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती दुभाजक ओलांडून उलटली, तर समोरून येणारी बस धडकून बाजूला गेली. उलटलेल्या बसला आग लागली. पोलिसांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले, मात्र सात जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, महाराष्ट्राचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली असून जखमी प्रवाशांवर मोफत उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत एअर इंडिया इमारत करारनाम्याचे हस्तांतरण

**मुंबई : प्रतिनिधी**

मंत्रालयाजवळील एअर इंडिया इमारत राज्य शासनाने खरेदी केली आहे. एअर इंडिया ॲसेट होल्डिंग कंपनी आणि राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील करारनाम्यांचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले.

मंगळवारी मंत्रीमंडळ बैठकीनंतर मंत्रिमंडळ सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, एअर इंडिया कंपनीचे वाणिज्य अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.



# पनवेलच्या मिडलक्लास सोसायटीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून अभीष्टचिंतन सोहळा आणि सुरेल गाण्यांचा कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. हा शानदार सोहळा मिडल क्लास हौसिंग सोसायटी मधील गणपती मंदिर हॉलमध्ये सोमवारी आयोजित करण्यात आला होता.

या सांगीतिक कार्यक्रमाला नागरिकांचा आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचेच उपस्थित मानवरानी अभिष्टचिंतन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी,ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, वाय टी. देशमुख, आस्वाद पाटील, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेतेतथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममताम्हात्रे, नगरसेविका राजू सोनी, अजय बहिरा, सुमित झुंझारराव, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे,उद्योजक राजू गुप्ते, मंगेश परुळेकर, संजय पोद्दार, डॉक्टर दीपक पुरोहित, सुहास हळदीपूरकर, शकुंतलाठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, स्वाती कोळी, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर, यांच्यासहमान्यवर उपस्थित होते.

या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, मिडल क्लास हौसिंगसोसायटीचे अध्यक्ष राजू गुप्ते आणि नगरसेवक तथा सोसायटी मित्रमंडळाचे अध्यक्ष सुमित उल्हास झुंझारराव यांनी केले होते.

या सोहळयासाठी सोसायटी मित्र मंडळ, हॅप्पी मॅन ग्रुप, सोसायटी महिला मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या रहिवाशांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान या कार्यक्रमावेळी भाजपचे ज्येष्ठनेते जे.एम.म्हात्रे आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले.



# पनवेल महापालिकेची फर्निचर दुकानांवर तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती ‘ड मार्फत मोठी अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. सोमवारी झालेल्या या कारवाईत सिमरन मोटर समोरील अनाधिकृत फर्निचरच्या दुकानांवर तोडक कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार करण्यात आलेल्या या कारवाईत जेसीबीच्या साहाय्याने अनाधिकृत फर्निचरच्या दुकानांवर तोडक कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले.



महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण विरोधात कारवाई करण्याच्या सूचना अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार चारही प्रभागात अतिक्रमण विरोधी मोठ्या कारवाया सुरू आहेत. या अतंर्गत नवीन पनवेलमधील अनाधिकृत फर्निचरच्या दुकानांवर कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने व प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या उपस्थितीत अतिक्रमण पथक व सुरक्षारक्षक यांच्या सहाय्याने करण्यात आली.

## लाभले आम्हास भाग्य कार्यक्रम

**पनवेल :** ओरायन मॉलला यंदा १० वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता पनवेलच्या क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आनंद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात 'लाभले आम्हास भाग्य' हा कार्यक्रम सादर होणार आहे. हा दहा वर्षांचा प्रवास परीक्षांचा आणि शिकवणीचा होता अशी भावना एम. पी. ग्रुपचे मंगेश परुळेकर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात अभिनेते सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे, अभिनेत्री मृण्मयी देशपांडे, गौतमी देशपांडे आणि संगीतकार अजित परब हे कलाकार सहभागी होणार आहेत. या आनंद सोहळ्यात निमंत्रितांना उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे अवाहन ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर आणि दिलीप करेलिया यांनी केली आहे.

## सोन्याचे मंगळसूत्र व रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** गाडीच्या दरवाजाची काच फोडून ११ ग्राम वजनाचे मंगळसूत्र आणि पन्नास हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी एक जून रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.३१ मे रोजी रात्रीच्या सुमारास महिंद्रा स्कॉर्पिओ वरील चालक हॉटेल ऋतिका बार अँड रेस्टॉरंट मुंब्रा पनवेल हायवे खुटारी गाव येथे पार्क करून ते हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले. यावेळी चोराने त्यांच्या गाडीची काच फोडून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

## मोलकरणीने चोरले दागिने

**नवीन पनवेल :** खारघर येथील घरातून पाच लाख ८० हजार रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी मोलकरणी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात ३१ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर येथे राहणाऱ्या फिर्यादी यांच्या घरातील मोलकरीण हिने फिर्यादी घरी नसताना तिच्याकडील चावीचा वापर करून त्यांच्या घरातील बेडरूमच्या कपाटात ठेवलेले रोख रक्कम आणि चार तोळे वजनाचे दागिने चोरून नेले.

## लिंबू पाण्याचा स्टॉल लावण्यावरून मारहाण

**नवीन पनवेल :** लिंबू पाण्याचा स्टॉल लावल्याचा राग मनात धरून ३५ वर्षीय इसमाला मारहाण केल्याप्रकरणी आठ ते नऊ जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात एक जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संदीप पडियाची हा सेक्टर १८, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांचे मामा यांनी पनवेल रेल्वे स्टेशन या ठिकाणी लिंबू पाण्याचा स्टॉल लावल्याचा राग मनात धरून आरोपी यांनी त्यांना शिवीगाळ केली. यावेळी विकास गुंजाळ यांनी त्याच्या कानाखाली दगडाने मारून दुखापत केली. सचिन धोत्रे यांनी लाकडी बॅटने मारहाण केली. निलेश गुंजाळ यांनी डोक्यावर मारहाण केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## दोन लाख एक हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** एपीके फाईल पाठवून मोबाईलचा ताबा घेऊन दोन लाख ११ हजार ८०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात ईसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ३१ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.रामचंद्र जाधव हे कामोठे येथे राहत असून आरोपीने तुमचे महानगर गॅस कनेक्शन बिल न भरल्यामुळे बंद होईल अशी भीती दाखवली आणि त्यांच्या व्हाट्सअप क्रमांकावर एपीके फाईल पाठवली. ती फाईल ओपन केली असता जाधव यांच्या मोबाईलचा ताबा घेऊन आरोपीने त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख एक हजार आठशे रुपये रक्कम टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर करून त्यांची फसवणूक केली.


## पोलादपूर स्थानकास मंत्री सरनाईक यांची भेट

**पोलादपूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पोलादपूर बस स्थानकास परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी नवीन स्थानकाच्या बांधकामाची पाहणी केली. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी नजिकच्या काळात पोलादपूर बस स्थानकाचे लवकरच लोकार्पण केले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

# पनवेलमध्ये ‘स्वर संध्या’ कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य ‘स्वर संध्या’ या सांगीतिक कार्यक्रमाने पनवेल परिसरातील संगीतप्रेमी रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. संगीत, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचा सुरेल संगम घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाला रसिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.





लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या मैदानावर उत्साहपूर्ण आणि भारावलेल्या वातावरणात झाला.

प्रारंभी लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी, हभप महादेवबुवा शाहबाजकर आणि ॲड. प्रसाद पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संगीताच्या सुरेल मैफलीला प्रारंभ झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, भाजपचे माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, रायगडभूषण पं. उमेश चौधरी, पं. तुषार चॅटर्जी, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, पूनम ठाकूर, वसंतबुवा पाटील, जे.टी. पाटील, मनोहर मसणे, संतोष पाटील, अशोक पाटील, विलास खानावकर, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, स्वप्नाल ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह संगीत क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजकारण, शिक्षण, संस्कृती आणि लोकसेवा अशा क्षेत्रांत दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ‘स्वर संध्या’ हा त्याचाच एक भाग ठरला.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या सारेगमप लिटल चॅम्प फेम गायिका अंजली गायकवाड आणि ज्ञानेश्वरी गाडगे यांनी आपल्या सुमधुर आणि प्रभावी गायनाने उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी सादर केलेल्या भावगीत, भक्तिगीत, अभंग व लोकप्रिय गीतांना रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पं.प्रतापबुवा पाटील यांची उत्कृष्ट मृदंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांचे तालवाद्य प्रभावी लाभले. या अनुभवी कलाकारांच्या समर्थ साथसंगतीमुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक खुलला. स्वर आणि ताल यांचा अप्रतिम मिलाफ अनुभवताना रसिकांनी वारंवार दाद देत कलाकारांचा गौरव केला.

याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या भजनांनी कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त करून दिली. गायिका शिवमाला पाटील यांनी ओजस्वी आणि भक्तिरसपूर्ण गायनातून उपस्थितांना भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली. त्यांना पखवाजवादक निलेश पाटील आणि तबलावादक मिलिंद कडू यांची सुरेख साथ लाभली. भजनाच्या सादरीकरणादरम्यान सभागृहात भक्तिरसाची अनुभूती निर्माण झाली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके यांनी आपल्या खास शैलीत केले. त्यांनी कलाकारांची ओळख करून देतानाच कार्यक्रमातील प्रत्येक सादरीकरणाचे वैशिष्ट्य रसिकांसमोर उलगडून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती तसेच रायगडभूषण पं. उमेश चौधरी, नादब्रह्म साधना मंडळचे अक्षय चौधरी, वैभव चौधरी यांनी मेहनत घेतली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शिवाजीनगर येथे अभीष्टचिंतन सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील अग्रणी व्यक्तीमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या आयुष्याची यशस्वी ७५ वर्षे पूर्ण केलीआहे. याबद्दल त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षार्पणाचे औचित्य साधून शिवाजीनगरक्रिकेट अकॅडमीच्या वतीने त्यांच्या दीर्घ व प्रेरणादायी प्रवासाचा गौरव करण्यासाठीआणि I उदंड आयुष्याच्या सदिच्छा देण्यासाठी या भव्य अभिष्टचिंत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम सोमवार, १ जून रोजीशिवाजीनगर येथे उत्साहात पार पडला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिष्टचिंतन करून निरोगी व दीर्घायुष्यासाठी मन...पूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी देशमुख, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, शिवाजीनगरअध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत,जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी,नीलेश खारकर, अनिरुद्‌ध पाटील, विनोद साबळे, विश्वनाथ कोळी, सचिन घरत,रोशन म्हात्रे, हेमंत पाटील, राजेश पाटील, नाना महेकर, अमित कडू , गजाननठाकूर, मनोज लोखंडे, शिवदास ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर उपस्थित होते.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

साधेपणा, विनम्रता आणि सर्वसामान्यांप्रती असलेल्या आत्मियतेमुळे लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर जनतेच्या सुख–दुःखात सहभागी होणारे सच्चे लोकनेते म्हणून ओळखले जातात. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध स्तरांतून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून समाजसेवेच्या या प्रदीर्घ, समर्पित आणि प्रेरणादायी प्रवासाबद्दल त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन केले गेले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जात, पात, धर्म, पक्ष असा कधीही भेदभाव मानला नाही. आपल्याकडून जेवढी मदत करता येईल तेवढी करायची आणि माणुसकी हाच त्यांचा धर्म कायम राहिला आहे. त्यामुळे त्यांची लोकांप्रती असलेली समर्पण भावना खऱ्या अर्थाने सुवर्ण अक्षराचे पान आहे. त्यांची किर्ती महान आणि सर्व समाजाला मार्गदर्शक आहे. म्हणूनच सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांची हजारोंच्या संख्येत अर्थात अफाट गर्दी केली होती.

दरम्यान, अमृत महोत्सवी वर्ष प्रचंड प्रमाणात विविध समाजोपयोगी उपक्रमाने साजरे झाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि राज्यातील मंत्रीमहोदय गणेश नाईक, भरत गोगावले, आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे तसेच कोकणातील आमदार आणि विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि दहा हजारहून नागरिक हितचिंतकांच्या उपस्थितीत १३ मे रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा उलवे नोडमध्ये भव्य असा अभीष्टचिंतन सोहळा झाला.

याचबरोबर वर्षभरात झालेल्या कार्यक्रमात भव्य कीर्तन महोत्सव, जिल्हास्तरीय भजन स्पर्धा, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, महिलांसाठी कर्करोग तपासणी विशेष शिबिर, रोजगार मेळावा, शिधा वाटप, नाट्य महोत्सव, वृक्षारोपण, ७५ अभंगांचे लोकार्पण, आगरी कोळी महोत्सव, श्रीरामार्पण सांस्कृतिक सोहळा, संगीत मॅरेथॉन, व्याख्याने, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, अभिनय स्पर्धा, कविसंमेलन, परिसंवाद, सन्मान सोहळा, सामूहिक बासरी वादन, निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा, प्रोग्रॅम कार्ड डेकोरेशन, राज्यस्तरीय निवड कबड्डी स्पर्धा आणि प्रशिक्षण, विमा पॉलिसी वाटप, बॅडमिंटन स्पर्धा, बॉक्सिंग स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, अशी विविध कार्यक्रम उत्कृष्ट आयोजनात पार पडले. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्यक्रम झाल्याने अमृत महोत्सवी वर्षाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित झाले.

## महिलांसाठी कॅन्सर जनजागृती, तपासणीसह आरोग्य शिबिर

मुख्य कर्करोग तपासणीसोबतच या शिबिरामध्ये इतर अनेक महत्त्वपूर्ण आरोग्य चाचण्या आणि समुपदेशन मोफत उपलब्ध करण्यात आले होते तसेच स्त्रीरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ आणि दंतचिकित्सा विभागामार्फत रुग्णांची सखोल तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून सल्ला देण्यात आला.

या शिबिरास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक मनोज भुजबळ, रामदास शेवाळे, अरुणकुमार भगत, नगरसेविका शिवानी घरत, अस्मिता घरत, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका चारुशीला घरत सुशीला घरत, संजय पाटील, अजय कांडपिळे, जगदीश घरत, गौरव कांडपिळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, यावेळी अनेकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## किल्ले रायगडावरील सुविधांची सर्व विभागांनी संयुक्त पाहणी करावी

या वेळी रायगड किल्ल्यावर सुरू असलेल्या जतन संवर्धन व विकासकामांची माहिती देण्यात आली. शिरकाई मंदिर, महादरवाजा आणि वाघ दरवाजाच्या संवर्धनाची कामे सुरू असून राणी वसाहतीचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले तसेच हत्ती तलाव व फुटका तलाव परिसरातील गाळ काढणे आणि गळती रोखण्याची कामेही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर रायगडावरील स्वच्छतागृहे, त्यांची देखभाल आणि पाणीपुरवठा या संदर्भातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर मंत्री ॲड. शेलार यांनी पुरातत्व विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय), जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थितीचा अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले. या पाहणीनंतर लवकरच मंत्रालयात एक बैठक घेऊन रायगड विकास प्राधिकरणाची स्वायत्तता, उपलब्ध निधी, देखभाल व्यवस्था, जनसुविधांचे व्यवस्थापन आणि विविध विभागांमधील जबाबदाऱ्या यावर व्यापक चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.


## संपादकीय

# तापमानवाढीचे गांभीर्य

हवामान बदलाचा शेती आणि मानवी आरोग्यावर मोठा परिणाम दिसू लागला आहे. राज्यातील स्थानिक पातळीवर हवामान बदलाचा काय परिणाम दिसतो आहे हे अधोरेखित करण्यासाठी राज्य वातावरण कृती कक्षाच्या सहकार्याने पंचायत परिषदांचे आयोजन केले जाते आहे. सध्या धाराशिवमध्ये सुरू असलेल्या दोन दिवसीय महिला पंचायत परिषदेमध्ये हवामान बदलाचा ग्रामीण महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम चर्चिला गेला.

**जागतिक सरासरी तापमानात दरवर्षी वाढ होत आहे. या तापमानवाढीतून जगभरात लक्षणीय हवामान बदल दिसू लागले आहेत. हवामान बदलांमुळे जगभरात टोकाच्या घटनांची वारंवारता आणि तीव्रता वाढली आहे हे एव्हाना पुरते स्पष्ट झाले आहे. शेती व बांधकाम क्षेत्रातील मजुरांच्या आरोग्यावर तापमानवाढीचा परिणाम सर्वाधिक दिसून येईल असा इशारा तज्ज्ञांनी कधीचाच दिला आहे. धाराशिव येथील महिला पंचायत परिषदेत महिलांनी नेमके हेच वास्तव समोर मांडलेले दिसून आले. तापमानवाढीमुळे शेतांमध्ये काम करणेच आता कठीण होऊ लागले आहे असा सूर या परिषदेत लागला. भल्या पहाटे उठून सकाळी सात वाजता शेतातील कामे सुरू करावी लागतात, अन्यथा उन्हामुळे शेतीची कामे होऊ शकत नाहीत असे महिलांनी म्हटले आहे. तापमानवाढीमुळे उष्माघाताचा त्रास, मळमळणे, थकवा आदी आरोग्य समस्यांचे प्रमाण वाढलेले दिसते. भारत हा आजही कृषीप्रधान देश असून परिषदेत महिलांनी मांडलेले वास्तव देशभरातील शेतमजूर अनुभवत आहेत. एकंदरच हवामानबदलाचा शेती व शेतीपूरक व्यवसायांवर मोठा परिणाम होतो आहे. तापमानवाढीमुळे पाणीटंचाईची समस्या तीव्र स्वरुप धारण करते आहे. पाणी आणण्याचे काम प्रामुख्याने महिला करतात. या कामात त्यांचा अधिक वेळ जात असल्याने त्याचा परिणाम अन्य कामांवर होतो. यापूर्वी अशा पंचायत परिषदा नागपूर, अंबाजोगाई व सुधागड येथेही पार पडल्या आहेत. परिषदांमधून समोर आलेले चित्र राज्य सरकार व जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवले जाणार आहे. ग्रामीण भागातील जनतेला हवामान बदलाच्या परिणामांना समजून घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे अत्यावश्यकच आहे. जागतिक स्तरावर यासंदर्भात मोठमोठ्या परिषदा होत आहेत. परंतु स्थानिक परिणाम समजून घेऊन त्यादृष्टीने जीवनशैलीत बदल घडवण्यासाठी व उपाययोजना निश्चित करण्यासाठी स्थानिकांना चर्चेत सहभागी करून घेणे गरजेचेच आहे. वाढत्या तापमानामुळे जगभरातच कामगारांची उत्पादकता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते असा अंदाज आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने यापूर्वीच व्यक्त केला आहे. नैसर्गिक आपत्तींविषयीची वाढती असुरक्षितता आणि पर्यावरणीय चिंता यामुळे नागरिकांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो आहे असे निरीक्षणही जागतिक स्तरावर नोंदले जाते आहे. वाढत्या नैसर्गिक आपत्तींमधील विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्नही ठिकठिकाणच्या सरकारी यंत्रणांना सोडवावा लागतो आहे. यातून उत्पन्नाचे नियमित मार्ग संपुष्टात आल्यास तसेच नागरिक बेघर झाल्यास त्याचा परिणाम परिसरातील गुन्हेगारीवरही दिसतो. उच्च तापमानाचा मानसिक आरोग्यावरही थेट परिणाम होतो. चिडचिडेपणा व आक्रमकता वाढीस लागते असे निरीक्षण तज्ज्ञ नोंदवतात. यातून हिंसक गुन्हेगारी व विशेषतः महिलांसंबंधीचा हिंसाचार वाढताना दिसतो असे निरीक्षण जागतिक स्तरावर नोंदवले गेले आहे. ऑनलाइन वर्तनावरही याचा परिणाम दिसतो असेही तज्ज्ञ म्हणतात. एकटेपणा, नैराश्य आणि स्वतःला इजा करण्याचे प्रमाणही यातून वाढू शकते. हवामानबदलांमधून उद्भवणाऱ्या साथरोगांच्या बदलत्या स्वरुपाचाही विचार आरोग्ययंत्रणांना जागरुकतेने करावा लागतो आहे. एकंदरच हवामान बदलाच्या मानवी जीवनावरील परिणामांना बारकाईने अभ्यासण्याची गरज आहे.**

# शरीर पोखरणाऱ्या तंबाखूचा मोह टाळा!



तंबाखू हे आपल्या आजूबाजूला सहज उपलब्ध असलेले विष आहे. त्याच्या संभाव्यतेबद्दल, त्यामुळे होऊ शकणाऱ्या जीवघेण्या आजारांबद्दल आणि धोक्यांबद्दल आपणा सर्वांनाच चांगली जाणीव आहे. आपण टीव्ही, वर्तमानपत्रे आणि सोशल मीडियावर तंबाखूविषयी जनजागृतीच्या जाहिराती पाहतो. निरक्षरांपासून ते उच्चशिक्षितांपर्यंत, सर्व वयोगटातील लोकांना त्याच्या दुष्परिणामांची साधारणपणे जाणीव आहे, पण ते ही गोष्ट गांभीर्याने घेत नाहीत. हीच आपल्या समाजासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. अगदी लहान शाळकरी मुलेही आपल्या डोळ्यांदेखत तंबाखू खाताना दिसतात. चौकात, पानटपरीवर प्रतिष्ठित घराण्यातील मुली आणि नामांकित शाळांमधील विद्यार्थीदेखील सिगारेट ओढताना दिसतात. मोठ्या शहरात तर फॅशनच्या नावाखाली सर्रास उघडपणे व्यसन करतात. गावांमध्ये आणि शहरांमध्येही तंबाखू वापरणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. तंबाखू आणि सिगारेटच्या पाकिटांवर धोक्याच्या सूचना दिलेल्या असतात, त्या वाचून आणि होणाऱ्या जीवघेण्या आजारांची चित्रे कशी समजून घ्यायची हे ही सर्वांना माहीत असते, पण त्या माहितीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. या वर्षी जागतिक तंबाखूविरोधी दिन २०२६ची संकल्पना "आकर्षणाचा पर्दाफाश निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाशी लढा" ही होती.

लोकांनी व्यसनाबद्दल असे गैरसमज निर्माण केले आहेत की, जणू त्यांचे आयुष्यच त्यासाठी समर्पित आहे. काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांची पचनक्रिया सुधारते, काही म्हणतात की तंबाखूमुळे त्यांना चांगली झोप लागते, काही म्हणतात की तंबाखू ओढल्याने त्यांना कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. ते तंबाखू ओढायला सुरुवात करतात आणि मग त्याचे व्यसनात रूपांतर करतात. हळूहळू तंबाखू शरीराला कमजोर करू लागतो, त्याचे अवयव पोखरतो आणि त्यांना महागड्या, असाध्य रोगांच्या उंबरठ्यावर आणून ठेवतो. आपण आपली सगळी संपत्ती खर्च केली तरी, मृत्यूला जीवनात बदलू शकत नाही. मग आपले व्यसन भागवण्यासाठी आपण हे मौल्यवान आयुष्य जीवघेण्या आजारांना का बळी देतो? इतरांना देखाव्याच्या इच्छेपोटी आणि पालकांच्या नियंत्रणाच्या अभावामुळे किशोरवयीन आणि तरुण पिढी तंबाखू, सिगारेट आणि हुक्का ओढायला सुरुवात करते. आधुनिकतेच्या या भ्रमात, शहरांमध्ये हुक्का पार्लरचे एक नवीन साम्राज्य फोफावत आहे, जे तरुणांच्या व्यसनाला खतपाणी घालत आहे.

तंबाखूचे सेवन विविध प्रकारे केले जाते, जसे : बिडी, सिगारेट, हाताने गुंडाळलेली सिगारेट, पाईप, सिगार, हुक्का, पाण्याचा पाइप, चुट्टा, धुमटी आणि चिल्लम. शिवाय, तंबाखू–आधारित पान, खैनी, गुटखा, खर्रा आणि तंबाखू पान मसाला देखील वापरला जातो. मिश्री, गुल, बज्जर, गुडाखू इत्यादी तंबाखूजन्य पदार्थ दातांना आणि हिरड्यांना लावले जातात आणि नस्य हुंगले जाते. भारतात तंबाखूच्या सेवनामुळे दररोज अंदाजे ३,५०० मृत्यू होतात. भारतात १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे २६.७ कोटी लोक तंबाखूचे सेवन करतात. २०११ मध्ये, ३५ ते ६९ वयोगटातील लोकांसाठी तंबाखू सेवनाचा आर्थिक खर्च १,०४,५०० कोटी रुपये होता.

जेव्हा एखादी व्यक्ती स्वतः धूम्रपान करत नाही, परंतु दुसऱ्याद्वारे केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येते आणि ऑक्सिजनसह तो धूर शरीरात श्वासावाटे आत घेते, तेव्हा ती व्यक्ती 'सेकंड–हँड स्मोकर' असते. आपल्या घरात किंवा घराच्या आसपास कोणीही धूम्रपान करत असल्याचे आपण अनेकदा पाहतो, ज्याचा धूर संपूर्ण घरात पसरतो आणि घरातील इतर सदस्यही त्या धुराचे बळी ठरतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, जे तंबाखूचे सेवन सोडत नाहीत, त्यांपैकी निम्म्याहून अधिक लोकांचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. तंबाखूमुळे दरवर्षी ७० लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो; यापैकी, अंदाजे १६ लाख लोकांचा मृत्यू अप्रत्यक्ष धूम्रपानाच्या संपर्कामुळे होतो. तंबाखूशी संबंधित आजारांमुळे अपंगत्व आणि दीर्घकाळ चालणारी, वेदनादायी आजारही होतात.

देशात दरवर्षी तंबाखूमुळे १३.५ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात, ज्यामध्ये धूम्रपान आणि अप्रत्यक्ष धूम्रपानामुळे होणाऱ्या अंदाजे १२ लाख मृत्यूंचा समावेश आहे. धूरविरहित तंबाखूमुळे निर्माण होणाऱ्या जागतिक आरोग्य भारापैकी ७० टक्के भार भारताचा आहे. धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे दरवर्षी २,३०,००० हून अधिक भारतीयांचा मृत्यू होतो. भारतातील तोंडाच्या कर्करोगाची जवळपास ९० टक्के प्रकरणे धूरविरहित तंबाखूच्या सेवनामुळे होतात. बिडी आणि सिगारेट ओढणारे लोक धूम्रपान न करणाऱ्यांपेक्षा ६ ते १० वर्षे लवकर मरतात. भारतातील कर्करोगाच्या एकूण प्रकरणांपैकी २७ टक्के प्रकरणे तंबाखूच्या वापरामुळे होतात. तंबाखू हा कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, फुफ्फुसांचे जुनाट आजार, पक्षाघात, वंध्यत्व, अंधत्व, क्षयरोग, तोंडाचे आजार आणि इतर अनेक आजारांसाठी एक अत्यंत धोकादायक घटक आहे. पुरुषांमध्ये ५० टक्के आणि महिलांमध्ये २० टक्के कर्करोगाची प्रकरणे तंबाखूमुळे होतात. तंबाखूमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला दरवर्षी अंदाजे ₹१७७३.४ अब्ज इतका फटका बसतो, जो देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या जीडीपी एक टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय अंतर्गत तंबाखू मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. देशातील तंबाखू उद्योगाचा नियोजित विकास सुनिश्चित करणे हा तंबाखू मंडळ अधिनियम १९७५चा उद्देश आहे. त्याच सरकारी वेबसाइटवरून मिळालेल्या माहितीनुसार २०२३–२४ या वर्षात भारतीय तंबाखू निर्यातीचे मूल्य १२,००५.८९ कोटी रुपयांवर पोहचले. मिळालेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षांत तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले आहे. तंबाखू उद्योग २०२४–२०२५मध्ये ४६ दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळाले तसेच निर्यातीतून ₹१६,७२८.०२ कोटींचा महसूल मिळाले. भारतीय तंबाखूची १२७ देशांमध्ये निर्यातही केली जाते. भारत हा तंबाखूचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक आणि उत्पादक देश आहे. भारतीय तंबाखू उद्योगाचे मूल्य १.१६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. एकट्या सरकारलाच दरवर्षी तंबाखू उत्पादनांवरून कराच्या स्वरूपात ७६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई होते. 'निकोटिन अँड टोबॅको रिसर्च' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधानुसार तंबाखूजन्य पदार्थांवर उत्पादन शुल्क म्हणून गोळा होणाऱ्या प्रत्येक ₹१०० मागे, तंबाखू सेवनामुळे समाजावर ₹८१६चा आर्थिक भार पडतो. यावरून हे सिद्ध होते की तंबाखूचा वापर हा राष्ट्रीय तिजोरीवर एक मोठा आर्थिक भार आहे.

तंबाखू किंवा इतर कोणतेही व्यसन सोडण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली स्वतःची इच्छाशक्ती. जर आपण दृढनिश्चयी असू, तर आपल्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक लोक आणि संस्था सेवेत उपलब्ध असतात. तंबाखू सोडल्याने खर्चिक आजार आणि वेदनादायी अकाली मृत्यू टाळता येतात. निर्व्यसनतेमुळे आपल्या शरीरातील अवयव अधिक कार्यक्षमतेने कार्य करू शकतात आणि गंभीर आजारांचा धोका कमी होतो. आरोग्यसेवेवरील खर्च कमी केल्याने, आपण आयुष्यातील इतर महत्त्वाच्या खर्चासाठी अधिक पैसे वाचवतो. तंबाखू सोडणे हे आपल्या मुलांसाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक आदर्श निर्माण करते. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी सरकारकडून सुविधाही उपलब्ध आहेत. देशातील विविध राज्यांसाठी तज्ञ समुपदेशकांद्वारे सर्व भाषांमध्ये दूरध्वनी मार्गदर्शन आणि समुपदेशन (टोल–फ्री १८०० ११२३५६) प्रदान केले जाते. मोबाईलवर (क्रमांक ०११ २२९०१७०१) टेक्स्ट मेसेजद्वारे देखील समुपदेशन दिले जाते. व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्रे जिल्हा स्तरावर उपलब्ध आहेत. तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र किंवा जिल्हा तंबाखू नियंत्रण केंद्र लोकांना त्यांचे व्यसन सोडण्यास मदत करण्यासाठी मोफत वैद्यकीय समुपदेशन, वर्तणूक थेरपी आणि औषधोपचार पुरवते. आपण शहरभरातील अनेक स्थानिक विशेष वैद्यकीय सुविधा, सामुदायिक व्यसनमुक्ती केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये उपचार घेऊ शकतो. जीवनाचे मूल्य ओळखा, स्वतःची आणि आपल्या प्रियजनांची काळजी घ्या आणि आजच तंबाखू सोडा.

–डॉ. प्रितम गेडाम



## बदलते तंत्रज्ञान

### एसी सुरू करण्यापूर्वी फक्त पाच मिनिटे करा 'हे' काम

मे महिन्यातील कडक उन्हामुळे घराघरांत एसीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे, मात्र अनेकदा एसी ऑन केल्यानंतरही खोली थंड होण्यास बराच वेळ लागतो. तज्ज्ञांच्या मते, या समस्येमागे खोलीतील वातावरण आणि विज्ञानाचे काही नियम कारणीभूत असतात. थोडेसे नियोजन केल्यास आपण एसीचे कूलिंग वाढवू शकतो आणि विजेची बचतही करू शकतो.




खोलीचे तापमान केवळ हवेवर अवलंबून नसून घरातील भिंती, छप्पर, फरशी आणि फर्निचर यावरही अवलंबून असते. दिवसभर पडणाऱ्या कडक उन्हामुळे घरातील भिंती आणि वस्तू उष्णता शोषून घेतात. जेव्हा तुम्ही घरात येऊन एसी चालू करता, तेव्हा एसीला केवळ हवेतील उष्णता नव्हे, तर या सर्व गरम झालेल्या वस्तू आणि भिंतीही थंड कराव्या लागतात. त्यामुळे सुरुवातीला एसीला जास्त कार्य करावे लागते.

तज्ज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार एसी सुरू करण्यापूर्वी खोलीचे दरवाजे आणि खिडक्या काही मिनिटांसाठी उघड्या ठेवाव्यात आणि छताचा पंखा फुल स्पीडवर सुरू करावा. वैज्ञानिक भाषेत याला 'एअर सर्कुलेशन' म्हणतात. पंखा सुरू केल्यामुळे खोलीत कोंडलेली गरम हवा वेगाने फिरते आणि खिडक्यांतून बाहेर पडते. यामुळे खोलीतील तापमान थोडे कमी होते. गरम हवा बाहेर पडून ताजी हवा आल्यामुळे एक समतोल तयार होतो. यानंतर जेव्हा तुम्ही एसी सुरू करता, तेव्हा एसीला कमी मेहनत घ्यावी लागते आणि खोली झटपट थंड होते.

एसीचे फिल्टर खोलीतील धूळ आणि कचरा अडवण्याचे काम करतात. सततच्या वापरामुळे या फिल्टरवर धुळीचा जाड थर जमा होतो. फिल्टरमध्ये धूळ जमा झाल्यामुळे हवेचा मार्ग अरुंद होतो आणि थंड हवा खोलीत पूर्ण वेगाने पोहोचू शकत नाही. त्यामुळे दर १५ दिवसांनी एसीचे एअर फिल्टर काढून स्वच्छ करणे अत्यंत गरजेचे आहे.

एसीच्या बाहेर असणाऱ्या 'आउटडोअर युनिट'चे काम खोलीतील उष्णता बाहेर टाकणे हे असते. जर या युनिटभोवती धूळ, कचरा किंवा झाडांची पाने साचली, तर उष्णता बाहेर पडण्यास अडथळा निर्माण होतो. याचा थेट ताण एसीच्या कॉम्प्रेसरवर पडतो आणि विजेचा वापरही वाढतो. यासोबतच, एसीमधील गॅस कमी झाला असेल तर कूलिंग व्यवस्थित होत नाही, म्हणूनच तज्ज्ञांकडून वेळोवेळी गॅस लेव्हल तपासून घ्यावी.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते बाबुराव पेंटर



## निमित्त

चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नाही, तर ते एक कला, संस्कृती, आणि विचारधारा व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या सुरुवातीच्या काळात, जेव्हा या क्षेत्राला आकार मिळत होता, तेव्हा एका प्रतिभावंत व्यक्तीने आपल्या कल्पकतेने आणि अथक परिश्रमाने या क्षेत्राला नवे आयाम दिले. ते होते बाबुराव पेंटर चित्रपट, चित्रकला, आणि शिल्पकलेच्या माध्यमातून भारतीय कलेला नवा चेहरा देणारे आद्य द्रष्टे.

भारतीय चित्रपटसृष्टीला सुरुवातीच्या काळात आकार देणाऱ्या थोर व्यक्तींपैकी एक म्हणजे बाबुराव पेंटर. त्यांच्या नावातच कला होती, आणि त्यांच्या कार्यात नव्या युगाचा आरंभ होता. बाबुराव पेंटर यांचा जन्म ३ जून १८९० रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे मूळ नाव बाबुराव कृष्णराव मेस्त्री असे होते. चित्रकला व शिल्पकला यांचे धडे त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाले. सुरुवातीला ते तैलचित्रे काढत. गंधर्व नाटक कंपनीच्या रंगवलेल्या पडद्यांमुळे बाबूराव पेंटर यांची कलाक्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण झाली. बाबूराव पेंटरांनी १ डिसेंबर १९१७ रोजी "महाराष्ट्र फिल्म" कंपनीची स्थापना केली. पुढे बाबूराव पेंटर यांनी कॅमेऱ्याचा वापर करून "गुड नाईट' नावाचा एक अवघा काही फूट लांबीचा लघुपट बनविला. या लघुपटात गजराबाई नावाच्या महिलेने भूमिका केली होती. आज हे नाव विस्मरणात गेले असले तरी भारतीय रूपेरी पडद्यावरची पहिली स्त्री गजराबाई या होत्या. त्यांच्यानंतर १९२८ च्या सुमारास अनुसयाबाई आणि गुलाबबाई चित्रपटसृष्टीत आल्या. चित्रपटसृष्टीत आल्यामुळे या महिलांना घरदार सोडावे लागले. समाजाने जणू त्यांना बहिष्कृत केले होते. अभिनेत्री असल्या तरी या महिलांना कॅमेऱ्याचे पार्ट बनविण्यासाठी लेथ मशिनचे चाक फिरवावे लागले, स्टुडिओची शेड उभारताना माती ओढण्याचेही काम करावे लागले. १९१९मध्ये बाबूराव पेंटरांनी "सैरंध्री" या आपल्या कलात्मक मूकपटाची निर्मिती केली. कल्पकता, भव्यता, स्त्रियांनीच केलेल्या स्त्री भूमिका आणि पौराणिक काळातील राजवैभवाचे दर्शन हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य होते. ७ फेब्रुवारी १९२० रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमागृहात "सैरंध्री" प्रदर्शित झाला व लो. टिळकांनी हा चित्रपट पहिला. त्यांनी बाबूरांवाना 'सिनेमा केसरी' या उपाधीने गौरविले. महाराष्ट्र फिल्म कंपनीद्वारा बाबूरावांनी १९२०–३० या दशकात एकूण १७ चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी "वत्सलाहरण" व "भक्त प्रल्हाद" हे पौराणिक, तर "सिंहगड", "कल्याण खजिना", "सती पद्मिनी " व "शहाला शह" हे ऐतिहासिक आणि "सावकारी पाश" हा सामाजिक कथानकावरील वास्तववादी चित्रपट होय. "सिंहगड" हा त्यांचा चित्रपट अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरला.

१९३० च्या सुमारास त्यांनी तयार केलेली सिनेमाची पोस्टर्स पाहून जे. जे. स्कूलचे तत्कालीन संचालक सालोमन यांनी त्यांचा सत्कार केला. जे. जे. स्कूलमध्ये काहीही शिक्षण घेतलेले नसतानादेखील रंगांच्या शुद्धतेविषयी व मिश्रणाविषयी बरीच माहिती त्यांना होती. चित्रकलेतील त्यांचे तंत्रकौशल्य म्हणजे रंगछटांचे वजन ते थोडेदेखील ढासळू देत नसत. त्यातूनच ते एक कल्पनारम्य, उत्कृष्ट अशी प्रतिमा निर्माण करत. त्यांनी तयार केलेल्या महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्या शिल्पकृती आजही कोल्हापूरमध्ये बघायला मिळतात. कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल 'कलामहर्षी' या पदवीने गौरवण्यात आले. त्यांनी १६ जानेवारी १९५४ रोजी जगाचा निरोप घेतला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रात्री झोण्याआधी मिठाच्या पाण्यानं गुळण्या का कराव्या?

रात्रीच्या रूटीमध्ये छोटे बदल करून तुम्ही हिरड्या आणि दात निरोगी ठेवू शकता. झोपण्याआधी कोमट पाण्यानं गुळण्या करणं हा एक सोपा उपाय आहे. झोपण्याआधी कोमट पाण्यात मीठ घालून या पाण्यानं गुळण्या केल्यास दीर्घकाळ तुमची ओरल हेल्थ चांगली राहू शकते. यामुळे तोंडातील बॅक्टेरियाज कमी होण्यास मदत होते. मिठाच्या पाण्यानं गुळण्या करण्याचे फायदे आणि गुळण्या करण्याची योग्य पद्धत समजून घेऊ. मिठाच्या पाण्याचे बरेच फायदे तुम्ही ऐकून असाल तोंडाच्या स्वच्छतेसाठी, चांगल्या आरोग्यासाठीसुद्धा मिठाचं पाणी वरदान ठरतं.



कोलगेट.कॉमच्या रिपोर्टनुसार मिठाचे अनेक औषधी उपयोग आहेत. मीठ सोडीयम क्लोराईडपासून तयार झालेल असते. ज्यामुळे तोंडाच्या बऱ्याच समस्या कमी होतात. जास्त गोड खाल्ल्यामुळे दातांवर प्लाकचा एक थर तयार होतो. अशावेळी दातांकडे दुर्लक्ष केले तर दातांचे अनेक आजार होऊ शकतात.मिठाच्या पाण्यानं गुळण्या केल्यानं दातांवरील प्लाकचा थर कमी होतो आणि दात स्वच्छ होतात.

मिठाच्या पाण्याने गुळण्या करण्याचे फायदे

१) तोंडातील बॅक्टेरिया कमी होण्यास मदत होते. कारण मिठाच्या पाण्यात नैसर्गिक एंटीसेप्टीक गुण असतात जे तोंडातील हानीकारक बॅक्टेरिया कमी करतात.

२) हिरड्यांची सूज आणि वेदनांपासूनही आराम मिळतो. हिरड्यांमध्ये सूज किंवा हलक्या वेदना होत असतील तर मिठाच्या पाण्यानं गुळण्या केल्यानं आराम मिळतो.

३) तोंडाची दुर्गंधी कमी होते. मिठाच्या पाण्यानं गुळण्या केल्यास बॅक्टेरिया कमी होतात. ज्यामुळे श्वासांची दुर्गंधी कमी होते.

४) घश्यातील खवखवीपासून आराम मिळतो. मिठाच्या पाण्यामुळे घशातील खवखव आणि जळजळ कमी होण्यास मदत होते.

मिठाच्या पाण्याने गुळण्या करण्याची योग्य पद्धत

एक ग्लास कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ मिसळा. हे पाणी तोंडात २० ते ३० सेकंद ठेवून गुळण्या करा. झोपण्याआधी दात घासल्यानंतर ही क्रिया करा. हा उपाय करताना गरजेपेक्षा जास्त मीठ वापरू नका. अनेकदा जास्तवेळ गुळण्या केल्यामुळे तोंड कोरडं पडतं. हिरड्यांमधून रक्त येत असेल किंवा तीव्र वेदना होत असतील तर एक्सपर्ट्सचा सल्ला घ्या. दातांच्या आरोग्यावर खर्च केले जाणारे हजारो रुपये वाचवण्याचा हा सोपा उपाय आहे.

# ‘धनगर समाजातील तरुण संघटित झाल्यास विकासाची दालने खुली होतील’



**पोलादपूर : प्रतिनिधी**

धनगर समाजाच्या विकासासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली. “समाज संघटित झाला तर विकासाची अनेक दालने खुली होतील. शासन दरबारी लागेल ते सहकार्य आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे. फक्त समाजाने एकजूट दाखवावी, असे आवाहन भाजपाचे विधान परिषदेचे गटनेते आणि स्वयंपुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष ना.प्रवीण दरेकर यांनी पोलादपूर तालुक्यातील सकल धनगर समाज, पोलादपूर यांच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१वी जयंती सोहळ्यात केले.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आबालवृद्ध महिला पुरुष समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो' आणि 'जय मल्हार'च्या गगनभेदी घोषणांनी पोलादपूर शहर दुमदुमले. पिवळ्या टोप्या, फेटे आणि पताका गळ्यात मिरवर्णाया धनगर समाज भगिनी बांधवांमुळे पोलादपूर शहरात पहिल्यांदाच आयोजित झालेल्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती सोहळ्याचे आयोजन दिमाखदार झाले.

कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहातील मुख्य कार्यक्रमास मोरे माऊली संप्रदायाचे अधिपती ह.भ.प. आनंददादा महाराज मोरे माऊली, भाजपा विधानपरिषद गटनेते प्रवीण दरेकर, उबाठा, शिवसेना सहसंपर्कप्रमुख संजय मानाजी कदम, व्याख्याते अविनाश धायगुडे, उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख नंदू शिर्के, भाजपचे सुरेंद्र चव्हाण, बिपीन म्हामुणकर, वैभव चांदे, कृष्णकांत दरेकर, रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. निलेश कुंभार, पंचायत समिती सदस्य अनिल दळवी, कोतवाल बुद्रुक सरपंच रेखा दळवी व मंत्री गोगावले यांचे प्रतिनिधी लक्ष्मण मोरे उपस्थित होते.

प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्या. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

मंत्री भरतशेठ गोगावले यांचे प्रतिनिधी लक्ष्मण मोरे यांनी मंत्री गोगावले धनगर समाजाच्या पाठीशी सदैव उभे राहतील अशी ग्वाही दिली. उबाठा शिवसेना सहसंपर्कप्रमुख संजय मानाजी कदम यांनी धनगर समाजाच्या विकासासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ह.भ.प. आनंददादा महाराज मोरे माऊली यांनी यावेळी प्रत्येकाने देश, देव आणि धर्म यांचे स्मरण कायम ठेवावे, असे आवाहन करून समाजातील एकता आणि संस्कारांचे महत्त्व विषद केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन सकल पोलादपूर धनगर समाजाने ह.भ.प. रामचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. यावेळी धनगर समाजाच्या शेकडो महिला पुरुष व तरूणांनी पोलादपूर शहरात पहिल्यांदाच शक्ती प्रदर्शन केले.

## सावरोली गावात घरफोडी; साडेतीन लाखांचा ऐवज चोरला

**खोपोली:** सावरोली गावाच्या हद्दीत चोरट्यांनी बंद फ्लॅट चा दरवाजा तोडून सोन्या चांदीचे दागिने आणि पन्नास हजार रोख रक्कम असा सुमारे साडेतीन लाखाची चोरी केल्याची घटना घडली आहे. सावरोली हद्दीत अरिहंत हौसिंग सोसायटीच्या फ्लॅट क्रमांक २०४मध्ये राहणा-या सविता रामचंद्र नरवणे वय ४३ या सोमवारी गावी गेल्या असताना चोरट्याने रात्रीच्या सुमारास फ्लॅटचा दरवाज्याचे सुरक्षा कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला घरातील सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

## सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या वाढदिवसानिमित्त फळेवाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार दि. १ जून रोजी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराध्यक्ष अमोल राजन जाधव आणि दिव्यांग सेल नवीन पनवेल अध्यक्ष प्रथमेश भगवान भंडारे यांच्यावतीने नवीन पनवेल, सेक्टर ६ येथील रुषिवन व रुपवन या दोन्ही वृध्दाश्रमात जावून सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या हस्ते वृध्द पुरुष-महिलांना फळे वाटण्यात आली.

यावेळी या दोन्ही वृध्दाश्रमाचे संचालक संतोष पवार यांनी सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांचे शाल व पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या व तेथील महिलांनी औक्षणही केले. यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे माजी सरचिटणीस प्रभाकर पवार, भाजपा उत्तर रायगड जिल्हा सदस्य श्याम साळवी, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराचे सरचिटणीस ॲड. शिवकुमार कांबळे, कोष्याध्यक्ष संतोष म्हस्के, सेलचे संयोजक विलास फडके, सागर येसनकर, जयेश कांबळे, साईनाथ भटकळ, अजिंक्य माने, भावेश बाईट, अनिकेत पंडीत, सुदेश तावडे, सुमित सकपाळ, कुणाल भंडारे आदि मान्यवर उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान

**पनवेल : रामप्रहार वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त युवा नेते मयूर अशोक शेळके यांच्या वतीने खारघर येथील फणसवाडी परिसरात अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मयूर अशोक शेळके यांनी डॉमिनोज पिझ्झाचे वाटप लहान मुलांमध्ये करून वाढदिवसाचा आनंद त्यांच्या सोबत साजरा केला. या कार्यक्रमास नगरसेविका सरस्वती कठारा, नगरसेवक सुमित झुंझारराव, जिल्हा परिषद सदस्या प्राची अमित जाधव, अमित मोहन जाधव (जिल्हाध्यक्ष - उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा भाजपा, माजी जिल्हा परिषद सदस्य व गटनेते - जिल्हा परिषद रायगड भाजपा), उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष आनंद ढवळे तसेच. विश्वजित पाटील (पनवेल तालुका पूर्व मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. समाजसेवा, आपुलकी आणि जनकल्याणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



## कायमस्वरूपी नोकरीसाठी प्रकल्पग्रस्तांचे उपोषण

**अलिबाग :** नागोठणे येथील पूर्वीच्या आयपीसीएल आणि आताच्या रिलायन्स कंपनीत ३२४ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत कायमस्वरूपी सामावून घ्यावे या मागणीसाठी प्रकल्पग्रस्त साताऱ्यानी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारपासून ( दि. २) उपोषण सुरू केलं आहे. भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हे आंदोलन करण्यात येत आहे. मुख्य सचिवांनी या प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश कंपनीला दिले होते. त्यानंतर मुंबईत आझाद मैदान इथं प्रकल्पग्रस्तांनी चार महिने आंदोलन केले. उद्योगमंत्री उदय सामंत आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्याबरोबर विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

## पाली-खोपोली राज्य महामार्गावर दारूच्या बाटल्यांचा खच; काचांमुळे वाहनांचे टायर पंक्चर

**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर आंबोले गावापासून ते थेट खुरवले पेट्रोल पंपाच्या पुढपर्यंत रस्त्यावर हजारो रिकाम्या दारू आणि बिअरच्या बाटल्या पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. महामार्गावर मोठ्या प्रमाणावर या बाटल्या फुटल्या असून, रस्त्याभर काचांचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या अनेक वाहनांच्या टायरमध्ये काचा घुसून टायर पंक्चर झाले असून, अपघाताचा अत्यंत गंभीर धोका निर्माण झाला आहे.

ही घटना सोमवारी (ता. १) रात्रीच्या सुमारास घडली असावी. भंगार किंवा रिकाम्या बाटल्या वाहून नेणाऱ्या एखाद्या ओव्हरलोड ट्रक अथवा मालवाहू गाड्यातून या बाटल्या रस्त्यावर कोसळल्या असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ट्रकचालकाच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडला असून, बाटल्या पडल्यानंतर संबंधित वाहन चालक तिथून पसार झाला असावा असे प्रवासी राहुल महाजन यांनी सांगितले.

मंगळवारी (ता. २) सकाळपासूनच या महामार्गावर नेहमीप्रमाणे मोठी रहदारी सुरू झाली. मात्र, रस्त्यावर पसरलेल्या काचांमुळे वाहन चालकांना गाड्या चालवणे अत्यंत कठीण झाले. अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे टायर पंक्चर झाल्याने प्रवाशांचे अतोनात हाल झाले असून, त्यांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला असे प्रवासी योगेश (विकी) भउड यांनी सांगितले. महामार्गावरील वाहतूक यामुळे संथ गतीने सुरू असून, प्रशासनाने तात्काळ हा रस्ता स्वच्छ करावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वाहन चालकांकडून केली जात आहे.



**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड -अलिबाग यांचे कार्यालय**
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क. ११/मा. अभि. /जाहीर नोटीस/ /सन २०२६ दिनांक :- ०२/०६/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री,व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

महालक्ष्मी गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.सर्व्हे नं.३६,हिस्सा नं.०, उसर्ली खुर्द,ता.पनवेल, जि.रायगड तर्फे अध्यक्ष श्री अजय सोमनाथ सुपेकर, यांनी १) श्री शाबाज हानिफ शेख व हजरा हानिफ शेखरा, इमारत विकासक तथा भागीदार गॅलेक्सी डेव्हलपर्स ४०१, नूर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., यारी रोड,वर्सोवा,अंधेरी(प.) मु.४०००६१ ,२) मे रामयोग एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार, रमेश देवजी गजोरा व महेंद्र अण्णा पवार, रा.कसबलंका को-ऑप हौसिंग सोसायटी लि. शॉप नं.१४,१५ व १६, प्लॉट नं.८५, सेक्टर-३,खोपर खैराणे, नवी मुंबई-४००७०८,३) श्री अरुण नाना गवते, ४)श्रीमती जनाबाई नाना गवते,५)श्री जगदीश नाना गवते, ३ ते ५ रा.गवते वाडी, पोस्ट दिघे, ता.ठाणे,जि.ठाणे यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३)अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
रायगड जिल्ह्यातील ता.पनवेल गाव उसर्ली खुर्द येथील गट क्रमांक व उपविभाग -३६, क्षेत्र २२००चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १६/०६/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :अलिबाग
दिनांक- ०२/०६/२०२६

**सही/-**
**तनविर संपतराव पाटील**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. अमर सेन तिवारी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **२१ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - चिंचवली तर्फे वाजे तालुका - पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट / सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. | नाव |
|---|---|---|---|---|
| ५७ | ३ | ० - ५० - ९०<br>पो.ख. ० - १३ - २० | १०.५७ | श्री. गणपत बामा पाटील |
| | | **एकूण ० - ६४ - १०** | | |
| वरील एकुण मिळकत ० - ६४ - १० हे. आर. पॉ., आकार १०.५७ रू. पैसे<br>पैकी विक्री क्षेत्र ० - २४ - ०० हे. आर. पॉ. | | | | |

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०१/०६/२०२६**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. 13, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर 3, सेक्टर नंबर 5, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. 9022317772.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकतीबाबतचे **रस्त्याकरीता वहिवाटण्याचे अधिकार** त्यापुढे नमूद केलेल्या व्यक्तींकडून मोबदल्यापोटी हस्तांतरीत/ विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-शिरवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | रस्त्याकरीता वहिवाटण्याचे अधिकार हस्तांतरीत करण्याचे नाव |
|---|---|---|---|
| ६५/२ | ०-२२-६०<br>पो. ख. ०-०१-७०<br>एकूण ०-२४-३०<br>**पैकी ०-०२-५०** | ४.२० | **श्री. ओमकार गुरुनाथ पाटील**<br>**श्री. दिपक गुरुनाथ पाटील** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०२/०६/२०२६**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-शिरवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नावे |
|---|---|---|---|
| ६५/१ | ०-२२-७०<br>पो. ख. ०-०१-७०<br>**एकूण ०-२४-३०** | ४.२० | **श्री. ओमकार गुरुनाथ पाटील**<br>**श्री. दिपक गुरुनाथ पाटील** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०२/०६/२०२६**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

# मुरुड तालुका पाणीटंचाई आराखडा मंजूर; टँकरद्वारे होणार जलपुरवठा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात सध्या तापमानात वाढ झाल्याने तलाव, नदी, नाले, विहिरी यांची पाण्याची पातळी खालावली आहे. तालुक्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये भीषण पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे. बोरली, मिठेखार, ऊसरोली या तीन ग्रामपंचायतींमध्ये भीषण पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे. याबाबत मुरुड पंचायत समितीकडून टंचाई आराखडा मंजूर करण्यात आला होता.



तहसीलदारांच्या शिफारशीने जिल्हाधिकारी यांच्याकडे अंतिम आराखडा मंजुरीसाठी पाठवण्यात आला होता. याबाबत तहसीलदार आदेश डफळ यांनी त्यांच्या दालनात लोकप्रतिनिधी यांना बोलावून या तीन ग्रामपंचायतींना टंचाईग्रस्त म्हणून टँकरने पाणीपुरवठा करण्याची अनुमती जिल्हाधिकारी यांनी दिली असल्याची माहिती दिली. लवकरच या ग्रामपंचायतींमध्ये टँकरद्वारे पाणी पुरविले जाणार आहे.

यावेळी मुरुड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ, शिवसेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे व माजी सभापती बाबू नागावकर यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुरुड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडून मिळणारा टँकर हा प्रत्येक आदिवासीवाडी, तारा बंदर, जेथे जेथे पाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी टँकरची संख्या जास्त मिळावी अशी आग्रही मागणी केली.

ज्या ठिकाणी भीषण पाणीटंचाई आहे तिकडे त्वरित टँकर प्राप्त झाला पाहिजे अशी मागणी केली आहे. ज्या ज्या ठिकाणी पाणी टंचाई असेल तिथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे ठरवण्यात आले.

# बोरघाटात ट्रक जळून खाक

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर बोरघाटातील किमी ३६ ढेकू गावाच्या हद्दीत मंगळवारी पहाटे ४.१५ वा.ब्रेक लाइनरल गरम झाल्याने ट्रकला आग लागली. यात ट्रक जळून खाक झाला. चालकाने प्रसंगावधान राखून चालत्या ट्रकमधून उडी मारली यावेळी जळता ट्रक तसाच पुढे जात समोर जाणाऱ्या ट्रकला धडक देऊन रस्त्याच्या मधील डिव्हायडरवर जाऊन आदळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. घटनेनंतर अर्धा तास वाहतूक विस्कळीत झाली होती.



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात काशीद, साळाव अव्वल

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत नुकतेच मुरुड तालुक्यातील काशीद व साळाव ग्रामपंचायतीचे जिल्हास्तरीय मूल्यमापन करण्यात आले. यासाठी जिल्हा परिषद पुणे येथील समितीने काशीद व साळाव ग्रामपंचायतींना भेट देऊन विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर मूल्यमापन समितीमध्ये पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (भा.प्र.से), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) भूषण जोशी, मुळशी पंचायत समितीचे कृषी अधिकारी सुमित शिंदे, पंचायत समिती खेडचे विस्तार अधिकारी तुषार साळुंके तसेच मनरेगाचे एपीओ साईराज प्रधान यांचा समावेश होता. समितीने विविध उपक्रमांची पाहणी केली.

# निवृत्ती कुथे यांचा सेवानिवृत्ती समारंभ

**नागोठणे : बातमीदार**

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या सुरक्षा ताफ्यात सुरक्षा अधिकारी म्हणून सुमारे सात वर्षांहून अधिक काळ कर्तव्यनिष्ठेने सेवा बजावणारे रायगड पोलीस दलातील उपनिरीक्षक निवृत्ती परशुराम कुथे यांचा सेवानिवृत्ती सोहळा ३१ मे रोजी गांधेचोळे येथील त्यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात झाला. आई-वडील शेतकरी असलेल्या एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा रायगड पोलीस दलात भरती होऊन उपनिरीक्षक पदापर्यंत पोहचून निवृत्त झाल्याने कुथे यांना अनेकांनी भरभरून शुभेच्छा दिल्या.

सेवानिवृत्ती सोहळ्यास त्यांच्या पत्नी हिरावंती निवृत्ती कुथे, ज्येष्ठ पुत्र कल्पेश कुथे, सून समृद्धी कल्पेश कुथे, छोटे पुत्र राकेश कुथे, मोठे बंधू केशव कुथे, मधुकर कुथे, मोहन कुथे, छोटे बंधू सोपान कुथे, निवृत्ती कुथे यांचे सोयरे व पेण पंचायत समितीचे माजी सभापती आणि विद्यमान सदस्य संजय भोईर, माजी सभापती मनिषा भोईर, मंत्री आदिती तटकरे यांचे माजी स्वीय सहाय्यक नंदन बळी, वरप येथील कीर्तनकार हभप भगवान कदम, कुर्डूस ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप पाटील, पोलीस खात्यातील





व कॉलेजमधील मित्रपरिवार, नातेवाईक व कुथे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या काही महिन्यांपूर्वीच पोलीस उपनिरीक्षकपदी बढती मिळालेले निवृत्ती कुथे १४ जुलै १९९३ रोजी रायगड पोलिस दलात शिपाई म्हणून रुजू झाले होते. सुरुवातीस अलिबाग मुख्यालयात काही महिने सेवा बजावल्यानंतर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील रेवदंडा, महाड, कोलाड अशा अनेक पोलीस ठाण्यात इमानेइतबारे सेवा बजावली होती. राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे या जिल्हा परिषद अध्यक्ष झाल्यापासून त्यांचा अंगरक्षक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यानंतर ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले.

या सोहळ्यात निवृत्ती कुथे व हिरावंती कुथे यांनी केक कापून सेवानिवृत्तीचा आनंद व्यक्त केला. या सेवानिवृत्ती सोहळ्यादरम्यान कुथे परिवारातील मुली व सुना यांनी खास बसविण्यात आलेली नृत्ये सादर करून सोहळ्यात रंगत आणली.

निवृत्ती कुथे यांचा मोठा मुलगा कल्पेश याने आपल्या बाबांच्या सेवकाळातील झालेल्या बदल्यांतील नवनवीन ठिकाणे, प्रत्येक वेळी बदली झाली की, मिळणारा नवीन मित्रपरिवार, सेवकाळात कुटुंबाला दिलेला कमी वेळ, अगदी त्याच्या विवाहाच्या २५व्या वाढदिवशीही कार्यक्रमातून बाबांना कर्तव्यावर जावे लागणे या सर्व गोष्टी सांगताना कल्पेश याला भरून आले आणि आता सेवानिवृत्ती नंतर बाबा आमच्या कुटुंबाला आता जास्तीत जास्त वेळ देणार असल्याने व मला फिरण्याची आवड असल्याने आता पूर्वीची सर्व कसर भरून काढणार असल्याचे यावेळी कल्पेश याने सांगितले.

यावेळी उपनिरीक्षक निवृत्ती कुथे यांनी अगदी मोजक्याच शब्दांत आपले मनोगत व्यक्त करून सोहळ्यास आलेल्या सर्वांचे आभार मानले.

# हभप निवृत्तीमहाराज इंदुरीकर यांचे वाक्रूळ येथे कीर्तन; समाजप्रबोधनाचा दिला संदेश

**पेण : प्रतिनिधी**

मावळा प्रतिष्ठान व प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मंगेश दळवी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "गजर कीर्तनाचा... सोहळा आनंदाचा" या धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे भव्य जाहीर कीर्तन पेण पूर्व विभागातील वाकरूळ येथील वाकेश्वर मंदिर परिसरातील विस्तीर्ण मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

या कीर्तन सोहळयास रायगड जिल्ह्यासह परिसरातील विविध भागांतून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. मैदान भाविकांनी फुलून गेले होते. हरिनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. कीर्तनादरम्यान उपस्थित भाविकांनी नामस्मरणात सहभागी



होत अध्यात्मिक आनंदाची अनुभूती घेतली.

ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आपल्या ओघवत्या, विनोदी आणि प्रबोधनात्मक शैलीतून अध्यात्म, संस्कार, व्यसनमुक्ती, सामाजिक बांधिलकी, कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व तसेच समाजातील विविध विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांना उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, पेण व रायगड परिसरातील सुमारे ८० टक्के जनता वारकरी संप्रदायाशी जोडलेली आहे. या भागातून मोठ्या प्रमाणात दिंड्या निघतात. मुलांना केवळ पैसा कमविण्यासाठी नव्हे, तर चांगले संस्कार मिळावेत यासाठी शिक्षण द्यावे, असा संदेश त्यांनी दिला. "जगातील सर्वात मोठी संपत्ती म्हणजे संस्कार" असल्याचे नमूद करत समाजात सुसंस्कारित पिढी घडविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

सध्या अनेक राज्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याबद्दल चिंता व्यक्त करत या शाळा टिकवण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" या विचारातून मावळा प्रतिष्ठान सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात कार्य करत असून, त्यांच्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नीलिमा पाटील, पेण नगराध्यक्ष प्रितम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव मानकर, पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोखंडे विद्यालयाचे मुख्याध्यापक अकील मुलाणी यांनी स्वीकारला पदभार

**मुरूड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी अकील मुलाणी यांनी पदभार स्वीकारला आहे. या शाळेचे मुख्याध्यापक अरुण खुळपे हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या रिक्त जागेनंतर मुलाणी यांनी पदभार स्वीकारला आहे.

मुलाणी यांना मुख्याध्यापकपदी चार्ज देतेवेळी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, सचिव गोविंद ठाकूर, सदस्य कृष्णा पंदेरे, उद्योजक सहादेव महाडिक, गो.म.वेदक कॉलेजचे प्राचार्य दिलीप ढाकणे, माजी मुख्याध्यापक अरुण खुळपे, मनीष तळेकर ठमके, बांगर, इंगावले, गोळे मॅडम, तेलंगे, मुख्य लिपिक दीपक भोसले, रमण महाडिक, कोंडीराम हिरवे, बबन जगताप आदी उपस्थित होते.



# नागोठण्यातील नुक्कड गल्लीत 'नो पार्किंग'ची गरज; वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस स्टेशनलगत असलेल्या नुक्कड गल्लीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. गेले अनेक वर्षे हा प्रश्न कायम असतानाही त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नुक्कड गल्ली हा नागोठणे गावातून बाहेर पडण्याचा प्रमुख मार्ग असून या रस्त्यावरून कोकण एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थी, श्री जोगेश्वरी मातेचे भाविक, पोस्ट ऑफिस व पोलीस स्टेशनमध्ये ये-जा करणारे नागरिक मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. त्यामुळे या मार्गावर कायम वाहतुकीचा





ताण असतो.

पोलीस स्टेशनमध्ये आयोजित शांतता समितीच्या बैठकीत नागरिक व पत्रकारांनी या प्रश्नाकडे वारंवार लक्ष वेधले, मात्र अद्यापही वाहतूक नियंत्रणासाठी ठोस पावले उचलली गेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने अनेक सुज्ञ नागरिकांनी शांतता समितीच्या बैठकींकडे पाठ फिरविल्याचेही दिसून येत आहे.

नुक्कड गल्लीसमोरच एसटी स्टँडमध्ये पार्किंगची व्यवस्था उपलब्ध असतानाही अनेक वाहनचालक गल्लीतच वाहने उभी करतात. यामुळे वाहतूक कोंडी अधिकच वाढत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास हा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो, असे मत जाणकार व्यक्तींनी व्यक्त केले आहे.

काही वर्षांपूर्वी नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी देविदास सोनवणे यांनी 'पी-१' आणि 'पी-२' ही वाहतूक नियंत्रणाची संकल्पना राबवून वाहतूक व्यवस्थेत मोठी सुधारणा केली होती. त्यामुळे त्याकाळात वाहतूक कोंडीचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आला होता.

नागोठणे शहरात वाढती वाहने, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणारे पार्किंग आणि वाढती लोकसंख्या यामुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण झाला आहे. आता नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी हे या समस्येवर कोणत्या उपाययोजना करतात, याकडे संपूर्ण नागोठणेकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

# माणगाव पोलिसांनी पोर्टलच्या मदतीने १५ गहाळ मोबाईल शोधून मालकांना केले परत

**माणगाव : माणगाव**

सर्वसामान्य नागरिकांचे गहाळ अथवा चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून देण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलचा प्रभावी वापर करत माणगाव पोलीस ठाण्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अंमलदार श्री. सुग्रीव उद्धवराव मुंडे यांनी मागील एक महिन्याच्या कालावधीत CEIR पोर्टलच्या माध्यमातून गहाळ झालेल्या तब्बल १५ मोबाईल फोनचा शोध लावला. या मोबाईल फोनची एकूण अंदाजित किंमत सुमारे चार लाख रुपये इतकी आहे.

गहाळ मोबाईल बाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची सखोल पडताळणी करून तसेच CEIR पोर्टलवर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संबंधित मोबाईलचा मागोवा घेण्यात आला. अथक प्रयत्नांनंतर विविध ठिकाणांहून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले. यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आज रोजी संबंधित तक्रारदारांना त्यांचे मोबाईल सुस्थितीत परत करण्यात आले.

आपले हरवलेले मोबाईल पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी माणगाव पोलीस ठाण्याचे तसेच पोलीस निरीक्षक संजय बांगर आणि पोलीस अंमलदार सुग्रीव मुंडे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

यावेळी नागरिकांनी देखील माणगाव पोलिसांच्या या कार्याचे कौतुक केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांना दिलासा देण्याचे काम माणगाव पोलीस ठाण्याकडून सातत्याने सुरू असून भविष्यातही अशाच प्रकारे जनसेवेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

"हरवलेला मोबाईल शोधून देणे ही केवळ मालमत्ता परत मिळवून देण्याची बाब नसून नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे काम आहे," अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# प्रा. तुळशीदास मोकल सेवानिवृत्त

**रोहा : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालयात इतिहास विभागात कार्यरत असलेले प्रा.तुळशीदास मोकल हे वयाच्या ६०व्या वर्षी अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन कार्याची २९ वर्षाची निर्विघ्न सेवा पूर्ण करून निवृत झाले.


सेवानिवृती कार्यक्रमास कोएसोचे प्रशासन अधिकारी प्रा.सुरेंद्र दातार, सहाय्यक प्रशासन अधिकारी डॉ. संदेश गुरव, प्राचार्य डॉ.अतुल साळुंके, दिनेश भगत, अनिल बांगर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्माजी कोळी, डॉ.कमलाकर कांबळे, प्रा. सुकुमार पाटील, प्रा.सीमा भोसले,प्रा. कृष्णा जांभेकर, प्रा. विनय शेलार आदी उपस्थित होते.

प्राध्यापक म्हणून कार्य करताना मोकल यांनी असंख्य विद्यार्थी घडविले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या यशात आणि प्रगतीत त्यांचा मोठा व महत्वाचा सहभाग होता, अध्यापन हे केवळ एक व्यावसायिक कार्य नसून ते समाजनिर्मितीचे एक पवित्र कार्य आहे असे मानून त्यांनी हे कार्य अत्यंत निष्ठेने व प्राणिकपणे केले. विद्यार्थ्यांशी असलेले नाते हे ते त्यांच्या जीवनातील सर्वात मोठे संचित आहे असे ते मानत होते. त्यांनी घडविलेले असंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत.

महाविद्यालयात काम करत असताना आजपर्यंत ३० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चासत्रांमध्ये सहभाग, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्र व परिषदांमध्ये २० शोधनिबंध त्यांनी सादर केले, तर नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे १० शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला इतिहास व पदव्युत्तर शिक्षण इतिहास या विषयांच्या प्रश्नपत्रिका निर्मिती समितीचे चेअरमन, पेपर तपासणी नियंत्रक, परीक्षा विभागासाठी अनेक वेळा भरारी पथक चेअरमन व सदस्य, महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या प्राध्यापक निवडीसाठी विद्यापीठ विषय तज्ज्ञ म्हणून काम, मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागात लेखक, संपादक, प्रश्नपत्रिका निर्मिती समितीचे चेअरमन, पेपर तपासणीत नियंत्रक म्हणून काम ,पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांसाठी २० पुस्तकांचे लेखन व सहा पुस्तकांचे संपादन, अभ्यास मंडळाचे सह-सदस्य म्हणून अनेक वेळा काम केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे गेली सात वर्ष त्यांनी रायगड जिल्हा समन्वयक म्हणून काम, कोविड-१९च्या आपत्ती काळात महाराष्ट्र शासन रायगड जिल्हा नोडल अधिकारी म्हणून काम, महाराष्ट्र राज्य निसर्ग व सामाजिक पर्यावरण : प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संचालक मंडळावर २०२२ पासून ते कार्यरत आहेत. ही त्यांच्या सेवा काळातील महत्वाची कामगिरी आहे. सेवानिवृती कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह गौरव करण्यात आला.

# अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com